नियमित दिवाणी दावा क्र. ३५८/२०१७
<u>अनिता वि. श्रीमती शारदाबाई आणि ईतर</u>

## नि.क्र. ४९ वरील आदेश

१. वादीतर्फे दाव्यामध्ये दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार दावा चालू असताना प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र सौ. स्मिता कांतकुमार पाटील, रा. उंडेगाव, ता. बार्शी यांना विक्री केलेले आहे. त्यामुळे त्यांना प्रतिवादी करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे त्यांचे नाव प्रतिवादी क्र. १७ म्हणून नोंद करणेस, दावा कलम ६अ हे उपकलम नमूद करुन त्यामध्ये दुरुस्ती अर्जानुसार मजकूर लिहीणे, दाव्याचे कारणामध्ये दुरुस्ती करणे व दावा कलम १२ मधील विनंती कलमातील कलम ब च्या खाली नव्याने दुरुस्ती करणे अशी प्रस्तावित दुरुस्ती करणे आवश्यक आहे. म्हणून सदरचा अर्ज वादीने दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी आपले म्हणणे दाखल न केल्याने अर्ज विना म्हणणे चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

४. सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी वादीने दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये दिलेल्या कथनाशी सुसंगत आणि स्पष्टीकरण देणारी आहे. प्रतिवादी क्र. १ ने दावा चालू असताना त्रयस्थ ईसमास दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र विक्री केलेली आहे. त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे जरुरीचे आहे असे दिसून येते. अशा परिस्थितीत जर प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून वरील कारणमिमांसेअंती मी या मतास आलो की प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचे सर्व वादमुद्दे निकाली काढण्यासाठी आवश्यक व गरजेची आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:

## आदेश

१) सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) वादीने दिनांक १९/०८/२०२२ पर्यंत किंवा तत्पूर्वी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन त्याच्या प्रती दाव्यात दाखल कराव्यात.

(ज. र. पठाण)

दिनांक : ०५/०८/२०२२ ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

Name of Stenographer :- S. V. Kokate (Grade III)

Court :- J.R. Pathan,3rd Jt. CJJD & JMFC,Barshi.

Order signed by the Presiding Officer on :- 05/08/2022

Order uploaded on :- 05/08/2022